# निंभोरा येथील सेंट्रल बँकेचे आनंद कवडीवाल पुन्हा सेवेत रुजू होणार

निंभोरा बु., ता.रावेर । वार्ताहर



गेल्या पंधरा ते वीस दिवसांपूर्वी निंभोरा येथील सेंट्रल बँकेत शाखेतील कॅशियर आनंद कवडीवाल यांची बाहेरगावी बदली झाली होती परंतु ग्रामस्थांच्या मागणीनुसार तसेच केंद्रीय राज्यमंत्री खा.रक्षाताई खडसे, खा.स्मिता ताई वाघ, रावेर यावल विधानसभा मतदारसंघातील आ.अमोल जावळे, जळगाव येथील आ.राजू मामा भोळे यांच्या प्रयत्नाने पुन्हा कॅशियर आनंद कवडीवाल निंभोरा सेंट्रल बँकेत आपला कार्यभार सांभाळणार असल्याने सेंट्रल बँकेच्या ग्राहकांनी आनंद व्यक्त केला आहे.



# पारोळा-भडगाव रोडवर दुतर्फा खडी टाकल्यामुळे अपघातांना आमंत्रण

पारोळा । प्रतिनिधी

येथील पारोळा चोरवड मार्गे भडगाव रस्त्याचे काम सुरू असून सदर ठेकेदाराने एका साईडने रस्ता सुरू करून दुसऱ्या साईडचा रस्ता येणारा जाणाऱ्यांसाठी चांगला ठेवला पाहिजेल परंतु या ठेकेदाराने पूर्ण रस्त्यावर खळी टाकल्यामुळे अनेक जण घसरून जखमी होत असल्याच्या घटना घडत आहेत. याबाबत चोरवड येथील सतीश पाटील यांनी कळविले की सदर ठेकेदार हा मनमानी पद्धतीने काम करत असून निष्कृष्ट दर्जाचे काम करून संपूर्ण रस्त्यावर खडी टाकून ठेवली असून यामुळे भोंडण, भोंडन तांडा, चोरवड, आचळगाव, आदी ठिकाणाचे मोटरसायकल चालक हे या खडीवरून घसरल्यामुळे जखमी होत आहेत तरी या ठेकेदाराने त्वरित काम पूर्ण करावे व एका साईडने रस्ता बनवून दुसऱ्या साईटचा रस्ता वाहनांना येण्या-जाण्यासाठी खुला सोडावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

# नशिराबाद येथे शेंदुर्णी घटनेचा निषेध

नशिराबाद, ता.जळगाव । वार्ताहर

येथे दि.१४ ऑगस्ट रोजी शेंदुर्णी या गावी परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे विटंबना करण्यात आली होती त्या अनुषंगाने नशिराबाद येथे बौद्ध समाजाच्या वतीने घडलेल्या घटनेचे जाहीर निषेध करण्यात आला यावेळी बौद्ध समाजाचे अध्यक्ष विनोद रंधे यांनी शेंदुर्णी या गावामध्ये घडलेल्या घटनेचा जाहिरत निषेध केला. ज्या नराधमाने हे कृत्य केले असेल त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद झाली पाहिजे व या कृत्याच्या मागे जो कोणी असेल ते शोधून काढायला पाहिजे जेणेकरून जिल्ह्याचे वातावरण खराब होणार नाही असे आपल्या मनोबतात व्यक्त केले. यावेळी शांताराम सोनवणे, रमेश रंधे, श्रावण बिराडे, सतीश सावळे, आनंदा रंधे तुषार रंधे सर अनिल देवळे प्रदीप सुरवाडे संदीप सुरवाडे राजू वाघ यशवंत करडे दीपक सोनवणे दीपक सपकाळे शुभम सपकाळे किरण सोनवणे पंकज रंधे रतन सुरवाडे संतोष रगडे रवी रंधे गणेश रंधे अभय सपकाळे विपुल रंधेबौद्ध समाजाचे उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी या घटनेचा तीव्र शब्दांमध्ये निषेध व्यक्त केला.

# मुक्ताईनगर नगरपंचायतीकडे हरकती प्राप्त

मुक्ताईनगर । प्रतिनिधी- नगरपंचायतीच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागाच्या भौगोलिक सीमा समाविष्ट करण्यासाठी व त्यावर हरकती व सूचना प्रसिद्धीची अधिसूचना १८ ऑगस्ट रोजी नगरपंचायतीच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली होती. २१ ऑगस्टपर्यंत नागरिकांना त्यावर हरकती घ्यावयाच्या होत्या. अधिसूचनेवर २५ नागरिकांच्या लेखी हरकती व सूचना नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या असल्याची माहिती नगरपंचायतीचे मुख्याधिकारी भूषण वर्मा यांनी दिली. प्राप्त झालेल्या हरकती-ॲड.अरविंद गोसावी यांनी हरकतीचे दिवस वाढवून देणे बाबतची हरकत, लक्ष्मण सापधरे यांनी हद्दीची व्याप्ती व गुगल नकाशा प्रभाग क्रमांक १५ मध्ये विसंगती बाबत हरकत, नितीन वंजारी यांनी प्रभाग २, ३ ,५ चे मतदानाविषयी, प्रमोद माळी यांनी प्रभाग दोन मधून २०० मतदान कमी करून एक मध्ये समाविष्ट करावे, वैभव कचरे, संजय धनगर, निलेश भारसाके, स्वप्निल आवारे, संजय बोरोले, अरमान पिंजारी, ओम माळी, मनोज आवारे, शेख रहेमान पिंजारी, विलास वराडे, नासिर पिंजारी या सर्वांनी प्रभाग क्रमांक १६ मधील १३, १४ घरे प्रभाग १७ मध्ये समाविष्ट करणे बाबतची हरकत, प्रशांत टोंगे यांनी प्रभाग १,२,३,५,६ मधील काही भाग कमी वाढवणे बाबत, नाना बोदडे यांनी प्रभाग १,२,३,५,६,७ मधील भाग कमी वाढवणे बाबत, तसेच दीपक धनगर, पृथ्वीराज बोदडे, तुषार महाजन, जाकीर अहमद, संतोष इंगळे यांनीही हरकती घेतलेल्या आहेत.

# पारोळ्याच्या स्वामिनारायण नगरमध्ये ट्रॅक्टर फसले

पारोळा । प्रतिनिधी

येथील म्हसवे शिवारातील स्वामीनारायण नगर येथे रस्त्यावर पिवर ब्लॉक बसवलेले असताना एक ट्रॅक्टर अचानक फसल्यामुळे ट्रॅक्टर चालकाची चांगलीच दमछाक झाली. याबाबत पारोळा तालुक्यातील म्हसवे शिवारात असलेल्या स्वामीनारायण नगर मधील रस्त्यावर बसवलेल्या पेवर ब्लॉक अचानक खर्चाल्याने त्यात रस्त्यावरून जाणारे ट्रॅक्टर फसल्यामुळे ट्रॅक्टर चालकास जेसीबी मागून सदर ट्रॅक्टर काढावे लागले यासाठी ट्रॅक्टर चालकास फारच दमछाक करावी लागली. म्हणून या स्वामीनारायण नगर मध्ये नवीन पेवर ब्लॉक बसवावे किंवा सिमेंट रस्ते बनवावेत अशी मागणी करण्यात आली आहे.

# शासकीय योजनांच्या लाभापासून शेतकरी वंचित

## निवड झालेल्या लाभार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर अडचणी

अमळनेर । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करताना अडचणी येत असून शासकीय योजनांचा लाभापासून शेतकरी वंचित राहील अशी परिस्थिती निर्माण झाल्या आहेत.

शासनाने शेतकरी बांधवाना विविध योजना देताना महाडीबीटी पोर्टल वर ऑनलाईन अर्ज करायला सांगितले आहे. मात्र अर्ज करताना विविध समस्या येत असल्याने अर्ज भरला जातं नाही. परिणामी सन २०२५-२६ या वर्षात कुठलाच लाभ मिळणार नसल्याचे तरी सध्यस्थीतीत चित्र दिसून येत आहे. राष्टीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक योजनेतर्गत सन २०२५-२६ मध्ये ८ ऑगस्ट २०२५ रोजी प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य पद्धतीने १२३६६४ (अक्षरी-एक लाख तेवीस हजार सहासे चौसष्ट) लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. मात्र यानंतर निवड झालेल्या लाभार्थ्यांना महाडीबिटी पोर्टल वर कागदपत्रे अपलोड करताना ॲग्रीस्ट्रक नंबर नमूद केल्यानंतर ओटीपी जात नाही. ओटीपी येत नसल्यामुळे कागदपत्रे अपलोड होत नाही. यामुळे अर्ज रद्द होत आहेत.

तर याच पोर्टलवर लाभार्थ्यांचे क्षेत्र झिरो दाखवत असल्यामुळे अर्ज करता येत नाहीत. फार्मर आय डी मार्फत शेतकऱ्यांना प्रोफाइल एडिट करता येत नाही. त्याचप्रमाणे सन २०२४-२५ व २६ अंतर्गत वितरक यांचे नाव महाडीबिटी प्रणालीवर दिसत नाही. आदी समस्या येत असल्याने शेतकरी बांधवांची समस्यांचे निवारण करून त्यांना शासकीय लाभ मिळण्यासाठी पोर्टल वरील तांत्रिक अडचणी दूर करण्यात याव्यात अशी मागणी होत आहे.

# स्वछता मोहिमेत भुईकोट किल्ल्यावर आढळून आला कारंजा

पारोळा । प्रतिनिधी

गडकिल्ले संवर्धनात जळगाव जिल्ह्यात अग्रणी असलेल्या राजा शिवछत्रपती या संस्थे मार्फत अमृत महोत्सवी (७५) मोहिमेचे रविवार दि.१७ रोजी पारोळ्यातील भुईकोट किल्ल्यावर स्वछता मोहिमेचे आयोजन केले होते, मोहिमेच्या पूर्वसंधेला शहरातील शिवस्मारकजवळ मशाल महोत्सव साजरा करण्यात आला, रविवारी स्वछता मोहिमेत छत्रपतींचा जयघोष करीत गडाच्या विविध भागात तसेच तटबंदी व तीन बुरुजावर स्वछता करण्यात आली यात किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बुरुजाजवळ पुरातन असे सुंदर कारंजे आढळून आले.




या परिसरात अजून काही काळाच्या ओघात गाडल्या गेलेल्या वास्तू असण्याची शक्यता नाकारता येत नाही बुरुज व तटबंदीवरील धोकादायक खुरटी झाडे काढण्यात आली पारोळा किल्ल्यावर पुरातत्व खात्यामार्फत संवर्धनाचे काम सुरु आहे त्यातून किल्याचे प्राचीन वैभव हळूहळू आकार घेत आहे पण काही नागरिक मात्र अजूनही किल्ल्यात येऊन घाण करतात हे थांबले पाहिजे परिसरातील व्यापारी व रहिवासी खंदकाचा कचरा कुंडी सारखा वापर करतात हे बंद झाले तर किल्ल्याच्या सौंदर्यात अजून भर पडेल असे स्पष्ट मत राजा शिवछत्रपती परिवाराचे जळगाव विभाग प्रमुख हेमंत पाटील यांनी व्यक्त केले जिल्हाभरातून ३०-३५ मावळे या मोहिमेला हजर होते.



# लासूर येथे बैल पोळा उत्साहात

लासूर,ता.चोपडा।वार्ताहर

येथे बैल पोळा निमित्ताने शेतकरी बंधूंनी बैलांना साजशृंगार करून जागेवर पुजा औक्षण करून गोड नैवेद्य खाऊ घातले.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या आदेशानुसार लंपी आजाराच्या प्रादुर्भाव लक्षात घेता बैलांना संसर्ग होणार नाही याची काळजी म्हणून गावात एका बैलजोडीचे स्वागत पोलीस पाटील जितेंद्र पाटील यांनी केले.

किसान विद्या प्रसारक मंडळाचे संचालक दिपक रतन महाजन,माजी सैनिक किशोर चौधरी, वि. का. सोसायटी माजी संचालक सुभाष निंबा माळी, महेंद्र माळी, अमोल गंभीर, माजी सरपंच देवीलाल बाविस्कर, वासुदेव सोनार, सागर महाजन, गणेश माळी, शेतकरी महेंद्र देविदास शेलकर तसेच ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते. एकंदरीत हा सण उत्साहात झाला.



# सातपुडा निवासिनी श्रीक्षेत्र मनुदेवी येथे आज यात्रोत्सव

चिंचोली, ता.यावल । वार्ताहर

सातपुडा निवासिनी श्रीक्षेत्र मनुदेवी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी पोळा सणाच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि.२३ रोजी मोठा यात्रोत्सव साजरा केला जात आहे. श्रावण महिन्याच्या पिठोरी अमावस्याला पोळा साजरा करून दुसरा दिवशी हा यात्रोत्सव साजरा करण्याची परंपरा आजही सुरू आहे. श्रावण महिन्याच्या अंतीम दिवशी आख्या जिल्ह्यातील भाविक देवीच्या दर्शनासाठी गर्दी करतात.सध्या पावसाळ्यात प्रशासनाने मनुदेवी धबधबा परीसरात फिरण्यास सक्त मनाई करण्यात आली असली तरी पावसाळ्यात निसर्ग रम्य ठिकाण असल्याने भाविक व पर्यटक प्रशासनाचा हा आदेश झुगारून देवीच्या दर्शनासाठी गर्दी करतात.

# चिनावल येथे संत सेना महाराज जयंती उत्साहात

चिनावल, ता.रावेर । वार्ताहर

येथील नाभिक समाज तसेच ग्रामस्थ, वारकरी बांधवा तर्फे दि.२० रोजी येथील नवीन विठ्ठल मंदिरात मोठ्या उत्साहात संत सेना महाराज जयंती चे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नाभिक समाज बांधवांतर्फे संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून संत सेना महाराजांच्या चरित्रावर आधारित चर्चासत्र राबवले यावेळी उपस्थित चिनावल येथील सर्व स्तरीय समाजबांधव तसेच ग्रामस्थ वारकरी यांनी उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा तसेच महाप्रसादाचे आयोजन करून लाभ घेतला यावेळीअध्यक्ष गोकूल साळुंके उपाध्यक्ष सर्पमीत्र कल्पेश साळुंके समाज बांधव महेंद्र साळुंके सचीन साळुंके सौरव साळुंके दिपक नीकम जगदीश फूलपगारे कीरण साळुंके हेमंत साळुंके योगेश साळुंके नीखील सनंसे शीवाजी साळुंके नीळकंठ नांद्रे गजू नांद्रे अशोक साळुंके रवींद्र साळुंके ईश्वर कोळी पंकज चौधरी दिपक सूर्यवंशी यांनी यावेळी परिश्रम घेतले.



# बिबट्याच्या हल्ल्यात तीन बकऱ्या ठार शेतकरी भयभीत, वनविभागाचे दुर्लक्ष

गुढे, ता.भडगाव । वार्ताहर



येथील रहिवाशी अमोल गुलाब पाटील यांचे गिरणा नदीकाठी शेत असून त्यांनी शेतातच बकऱ्यासाठी पत्रीशेड बांधले होते.याठिकाणी दि.२१ रोजी रात्रीच्या सुमारास बिबट्याने शेतातील शेडमध्ये प्रवेश करून बांधलेल्या तीन मोठया बकऱ्यांवर बिबट्याने हल्ला करून जागेवरच ठार केले. तर एक बकरी शेतात ओढून तिचा जागेवरच फडशा पाडला आहे या ठिकाणी बिबटयाचा पायाचा माग ठसे दिसून येत असल्याने शिवारातील शेतकरी या हल्ल्याने भयभीत झाली आहेत. सदर शेतकऱ्यांचे साधारण ५० हजार रुपयांचे मोठे नुकसान झाले असून नुकसान भरपाईची द्यावी तसेच या परिसरात पंधरवड्यात याच परिसरात चौथा हल्ला असून बिबट्याचा वावर याच शिवारात दिसून येत असल्याने शेतकरी धास्तावले आहेत या शिवारात ठिक ठिकाणी टॅब कॅमेरा,पिंजरा लावण्यात यावी अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे.



# धनाजी नाना महाविद्यालयात डॉ.रंगनाथन जयंतीनिमित्त 'ग्रंथपाल दिन' साजरा

फैजपूर । प्रतिनिधी

येथील धनाजी नाना महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त 'ग्रंथपाल दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आयोजित या कार्यक्रमात डॉ.रंगनाथन यांच्या ग्रंथालय शास्त्रातील योगदानाला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात उप प्राचार्य डॉ.मनोहर सुरवाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि डॉ.रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी ग्रंथालय समिती समन्वयक प्रा.डॉ.राजेंद्र ठाकरे, उपप्राचार्य डॉ.हरिष नेमाडे, उपप्राचार्या डॉ.कल्पना पाटील तसेच प्रा.दीपक सूर्यवंशी, डॉ. मच्छिन्द्र पाटील, प्रा.डॉ.सतीश पाटील, प्रा.डॉ.सविता वाघमारे, प्रा.डॉ. आय पी ठाकूर प्रा.विजय तायडे आदी उपस्थित होते. यावेळी ग्रंथालय समितीचे समन्वयक प्रा.डॉ राजेंद्र ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजून सांगताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, नेपोलियन यांच्या वाचनाबद्दल असलेल्या मतांचा उल्लेख करून वाचनाचे महत्त्व पटवून दिले. डॉ.रंगनाथन यांच्या कार्याचा गौरव करताना अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. सुरवाडे यांनी 'ग्रंथालय ही चैनीची वस्तू नसून जीवनावश्यक गरज आहे', या विचारावर भर दिला. 'ग्रंथालय हे ज्ञानाचे दालन आहे' या विषय विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. डॉ.रंगनाथन यांची ग्रंथालय शास्त्रासाठी मांडलेले पाच मूलभूत सिद्धांत आजही मार्गदर्शक ठरत आहेत असेही आपल्या भाषणात सांगितले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नयना नरेंद्र पाटील आणि हेमंत येवले यांनी उत्स्फूर्तपणे आपले वाचनाचे अनुभव मांडले. सूत्रसंचालन ग्रंथपाल आय.जी.गायकवाड यांनी केले, तर आभार यू.आर.पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी सहर्ष चौधरी, सौ.सुरेखा सोनवणे सौ.यामिनी पाटील यांनी परिश्रम घेतले.



# श्रीमती संगीता पाचपांडे यांची नियुक्ती

विवरे, ता. रावेर । वार्ताहर

शिक्षण विकास मंडळ विवरे संचलित श्री ग गो बेंडाळे हायस्कूल विवरे ता रावेर जिल्हा जळगाव या संचालक मंडळाच्या कार्यकारणीवर कै. रमेश माधव पाचपांडे माजी संचालक यांच्या निधनाने रिक्त जागेवरती संस्थेच्या सभासद श्रीमती संगीता रमेश पाचपांडे यांची संचालक म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन प्रा शैलेश राणे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत व अभिनंदन केले. यानंतर गोपाळ दूध उत्पादक संघ लि विवरे बुद्रुक ता रावेर संचालक मंडळावर बिनविरोध निवड झाल्याबद्दल संस्थेचे संचालक दिलीप लक्ष्मण राणे यांनाही शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे व्हाईस चेअरमन गोपाळ राणे, सचिव केशव राणे, संचालक धनजी लढे, रामचंद्र देशमुख, व्ही एस राणे, मुख्याध्यापक पी एच वायकोळे, मुख्याध्यापिका सौ.हर्षाली बेंडाळे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
MAHARASHTRA STATE LOTTERY
महाराष्ट्र साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते शनिवार
MAHARASHTRA WEEKLY LOTTERY
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
₹ 8 लाख
तिकीट ₹ 50/-
महाराष्ट्र महाराष्ट्रलक्ष्मी
सोडत दि.26/07/2025 विजेता तिकीट क्र: ML-00-1655
रिटेलर: मिश्रा लॉटरी सेंटर, नाशिक
स्टॉकिस्ट: चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

# डॉ.मुकुंद करंबेळकर राज्यस्तरीय मिलिंद विंचूरकर पुरस्काराने सन्मानित

चाळीसगाव । प्रतिनिधी


चाळीसगाव येथील रंगगंध कलासक्त न्यासच्या माध्यमातून विशेषत: २३ वर्षे सातत्याने जागतिक पातळीवर अभिवाचन महोत्सव साजरा करणाऱ्या चाळीसगावच्या डॉ मुकुंद करंबेळकर यांना मिलिंद विंचूरकर स्मृती हौशी नाट्य कलावंत राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच ज्येष्ठ रंगकर्मी आणि नाट्य प्राध्यापक दिलीप घारे यांच्या हस्ते संभाजीनगर येथे देण्यात आला. त्याच वेळी सुप्रसिद्ध साहित्यिका छाया महाजन यांच्या हस्ते डॉ सौ मिनाक्षी करंबेळकर यांनाही गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात सुरुवातीला गिरीश जोशी लिखित आणि पद्मनाभ पाठक दिग्दर्शित फायनल ड्राफ्ट या नाटकाचे अप्रतिम नाट्यपूर्ण अभिवाचन ज्येष्ठ रंगकर्मी दिलीप घारे आणि सुजाता पाठक यांनी केले. त्यांना प्रेक्षकांची भरघोस दाद मिळाली. प्रास्ताविक श्रीकांत उमरीकर यांनी केले. पुरस्काराविषयी मनोगत आणि डॉ करंबेळकर यांचा परिचय मुकुंद विंचूरकर यांनी केला. सत्कारार्थी डॉ मुकुंद करंबेळकर यांनी धन्यवाद देत रंगगंधच्या अभिवाचन महोत्सवाची वाटचाल विषद केली. प्रा दिलीप घारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अभिवाचन या कलाप्रकाराबद्दल वेगळा दृष्टिकोन दिला. ज्येष्ठ रंगकर्मी किशोर पुराणिक, परभणी यांनी आभार मानले. हा हृद्य घरगुती सन्मान सोहळा सुमारे दीडशे रसिकांच्या उत्साही उपस्थितीत पार पडला.




अकरावे पुण्यस्मरण

कै.श्रीधर एकनाथ पाटील(गुरुजी)
मृत्यू दि.२३/०८/२०१४
रा.आळंदी(देवाची) (मुळगाव अंजाळे, ता.यावल)
बाबा..
आधाराचा आधार तुम्हीच बनविले.
श्रम करण्यास तुम्हीच दाखविले..
दुःख पचविण्यास तुम्हीच शिकविले..
तुमची आठवण पाऊला पाऊली येते..
पुण्यस्मरण दिनानिमित्त विनम्र अभिवादन
|| शोकाकुल ||
गेंदू नेमाडे — सौ.वैशाली नेमाडे
दीपक पाटील — सौ.सुनिता पाटील
ललित फिरके — सौ.संगीता फिरके
मानस तटकरी — सौ.मोनाली तटकरी
गणेश नेमाडे — सौ.प्रियंका नेमाडे
घनःशाम पाटील — सौ.चित्रलेखा पाटील
लोकेश पाटील — सौ.निकिता पाटील
कुणाल जावळे — सौ.तेजश्री जावळे
खुशी, भुवी, तेजस, योशित, अद्वैत, रेवांश

अभिनंदन

कु.डॉ.यज्ञा अनिल लढे
डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेज, पुणे येथून बी.ए.एम.एस.च्या अंतिम वर्षात प्रथम क्रमांक व विद्यापीठातून गोल्ड मेडल मिळविल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
दिपक पाटील — सौ. सुनिता पाटील
प्रा. नारायण तळेले — सौ. ज्योती तळेले
प्रा. आर. वाय. पाटील — सौ. सुवर्णा पाटील
प्रा. देवेंद्र पाचपांडे — सौ. ज्योती पाचपांडे
प्रा. ललित चौधरी — सौ. हेमांगी चौधरी
सुरेश भोगे — सौ. मनिषा भोगे
युवराज वाघुळदे — सौ. सुरेखा वाघुळदे
सतीश इंगळे — सौ. लिना इंगळे
युवराज फिरके — सौ. भारती फिरके
ललित फिरके — सौ. संगिता फिरके
संजय चौधरी — सौ. नकुषा चौधरी
अनिल लढे व मित्र परिवार, न्हावी,ता.यावल

जिवेत् शरद शतम:

मा.आ.श्री. मंगेशदादा चव्हाण
आमदार-चाळीसगाव विधानसभा
चेअरमन-जळगाव जिल्हा दूध संघ, जळगाव
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
.... शुभेच्छुक ....
नितीन नारायण चौधरी — संचालक-जिल्हा दुध संघ, जळगाव; चेअरमन-न्हावी सह.दुध उत्पादक संस्था, न्हावी
पराग गोपाळ वाघुळदे — व्हा.चेअरमन
सर्व संचालक मंडळ
श्री. प्रविण भास्कर वारके, श्री. देवेंद्र भानुदास चोपडे
श्री. सागर अविनाश फिरके, श्री. गणेश रोहिदास इंगळे
श्री. सुधाकर मनोहर पाटील, श्री. उमेश सतीष बेंडाळे
श्री. जयंत लालू बेंडाळे, श्री. प्रविण रामदास चौधरी
श्री. सुजय खेमचंद महाजन, श्री. ज्ञानदेव सोनू फिरके
श्री. किशोर शंकर तळेले, श्री. किरण देविदास धनगर
सौ. कविता किशोर वाघळूदे, श्रीमती.पुष्पा ज्ञानदेव चौधरी
श्री. डोंगर लहानू तायडे, श्री. तुषार भोजराज बोरोले
श्री. धीरज सुधाकर चौधरी, श्री. पंकज भागवत फेगडे, सेक्रेटरी
सर्व सभासद व कर्मचारी वृंद
न्हावी सहकारी दुध उत्पा संस्था, न्हावी, ता.यावल

अभीष्टचिंतन!

मा.आ.श्री.मंगेशदादा रमेश चव्हाण
आमदार, चाळीसगाव विधानसभा
चेअरमन, जळगाव जिल्हा दूध संघ,जळगाव
भाऊ, आपणास वाढदिवसाच्या खूप-खूप हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक

श्री.ठकसेन भास्कर पाटील
संचालक-जळगाव जिल्हा दूध उत्पादक संघ, जळगाव
सदस्य-ग्रामपंचायत चिनावल, ता.रावेर
चि. मोनिष ठकसेन पाटील, चि. टिनेश ठकसेन पाटील
व समस्त भा.ज.पा. कार्यकर्ते,चिनावल ता.रावेर